अस्थायी कर्मचाऱ्यांना कायमपणाचे
फायदे देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्र. एस-१४/८७/६३९७४/३१३-ई-७.
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक:- १७ -२-१९८८.

वाचा:- १] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. आरसीटी-१०७६/८७६९८/ई-७, दिनांक २७. ९. १९७६ आणि

२] शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. स-१४/८२/४२३९/७०४/ई-७, दिनांक ७. ६. १९८४.

परिपत्रक:

शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. आरसीटी-१०७६/८७६९८/ई-७, दि. २७. ९. १९७६ मधील आदेशान्वये फक्त ब्युरो ऑफ एक्झामिनेशन, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे यांच्यातर्फे दिलेल्या टंकलेखनाचे प्रमाणपत्र लिपिकांच्या स्थायीकरणासाठी ग्राह्य धरण्यात येत आहे. तथापि, शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. स-१४/८२/४२३९/७०४-ई-७, दि. ७. ६. १९८४ अन्वये शासनाने वरील संस्थेच्या प्रमाणपत्राबरोबरच ज्या संस्थांना इन्स्पेक्टर ऑफ कमर्शिअल स्कूल, महाराष्ट्र राज्य यांनी मान्यता दिलेली आहे, अशी प्रमाणपत्रेही ग्राह्य धरण्याचे आदेश देण्यांत आले होते. सदर आदेशात आता बदल करण्यात येऊन, या संबंधात शासनाचे असे आदेश आहेत की, ज्या संस्थांना इन्स्पेक्टर ऑफ कमर्शिअल स्कूल, महाराष्ट्र राज्य यांनी मान्यता दिलेली आहे अशा संस्थांची प्रमाणपत्रे फक्त दि. ३०. ११. १९८७ पर्यन्तच कर्मचाऱ्यांना स्थायीकरणाचे फायदे देण्यासाठी ग्राह्य धरण्यात यावीत. दिनांक ३०. ११. १९८७ नंतर कुठल्याही संबंधित अस्थायी कर्मचाऱ्याला कायमपणाचे फायदे देताना ब्युरो ऑफ गव्हर्नमेंट एक्झामिनेशन, पुणे यांनी दिलेली प्रमाणपत्रेच ग्राह्य धरण्यात यावीत.

२. ज्या कर्मचाऱ्यांकडे दि. ७ जून, १९८४ च्या आदेशाप्रमाणे इन्स्पेक्टर ऑफ कमर्शिअल स्कूल, म. रा. पुणे यांनी मान्यता दिलेल्या संस्थाची प्रमाणपत्रे असतील ती प्रमाणपत्रे दि. ३०. ११. १९८७ नंतरच्या प्रकरणांसाठी ग्राह्य धरली जाणार नाहीत.

३. या आदेशान्वये या संबंधातील यापूर्वीचे म्हणजे दि. ७ जून १९८४ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

४. हे आदेश सामान्य प्रशासन विभाग व शिक्षण व सेवा विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[मी. म. सावंत]
कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग.

प्रति,
आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई,
आयुक्त, पुणे विभाग, पुणे.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
22 FEB 1988
जिल्हाधिकारी